सोमवार, दि. ३१ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २३८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282





रमजानच्या उपवास महिन्याच्या समाप्तीचे प्रतीक असलेली ईद-उल-फित्र सोमवारी (३१ मार्च २०२५) देशात साजरी केली जाईल. रमजान ईदनिमित्त रविवार (दि ३०) बाजारात सामग्री खरेदीसाठी गर्दी दिसून आली (छाया - जावेद तंबोली)

## रुक्मिणी परिवाराच्या चैत्र पालवी संगीत कार्यक्रमाने जालनेकर रसिक झाले तृप्त

**जालना । प्रतिनिधी -** गुढीपाडवा आणि नवसंवत्सराच्या निमित्ताने रुक्मिणी परिवार, जालना यांच्यावतीने शनिवार दि. २९ मार्च रोजी आयोजित चैत्र पालवी हा संगीत व नृत्याविष्कार कार्यक्रम रुक्मिणी गार्डन येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा परिवाराचा रौप्य महोत्सवी कार्यक्रम होता.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजीनगर येथील ध्यास परफॉर्मिंग आर्ट्सच्या संचालिका केतकी नेवपूरकर यांच्या विद्यार्थिनींनी शारदा वंदना आणि श्रीराम स्तुतीवर आधारित नृत्य सादरीकरणाने झाली. प्रसिद्ध टीव्ही कलाकार चैतन्य कुलकर्णी, शाल्मली सुखटणकर आणि प्राची खोत यांनी मराठी आणि हिंदी संगीताच्या सुरेल सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. प्रा. सचिन नेवपूरकर यांच्या संकलन आणि संचालनाखाली भेटी लागे जीवा, अभिर गुलाल उधळीत रंग, मायेच्या हळव्या... मन उधाण वाऱ्याचे, मी मज हरपून बसले गं, येऊ कशी प्रिया, जागर आईचा जागर यांसारखी भावगीते तसेच लग जा गले, अभी ना जाओ छोड़कर, मधुबन में राधिका नाचे रे, ओ संजना, बरखा बहार आयी, हो यारा सिली सिली, सलोना सास गझल अशा हिंदी गाण्यांचे सादरीकरण झाले. याशिवाय श्रीराम स्तुती, जय स्तुते श्री महामंगले, गीत रामायण मेळोडी, देवीचा गोंधळ, नदीच्या पल्याड या भक्तिगीतांनी आणि लोकसंगीतानेही कार्यक्रमात रंगत आणली. काही गाण्यांना वन्स मोर मिळाला तर देवीच्या गोंधळावेळी रसिक नृत्याच्या ठेक्यावर बेभान झाले.

कीबोर्डवर राजेंद्र तायडे आणि राजेश देहाडे, बासरीवर गिरीश काळे, ऑक्टोपॅडवर अमित निर्मल, तबल्यावर गोपाल खोमणे आणि गिटारवर अजय तायडे यांनी साथसंगत केली. दमदार व अभ्यासपूर्ण निवेदन अभिजीत कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने झाले. प्रारंभी किशोर देशपांडे यांनी प्रास्ताविक केले तर सुनील जोशी यांनी आभार मानले. रुक्मिणी परिवाराच्या सदस्यांनी परिश्रमपूर्वक रौप्य महोत्सवी वर्ष मोठ्या थाटामध्ये साजरे केले. या कार्यक्रमास जालनेकर रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रम अधिक भव्य आणि संस्मरणीय बनवला.





## परतूर येथे बौद्धाचार्य प्रमाणपत्र परीक्षा संपन्न

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथे भारतीय बौद्ध महासभा जालना यांच्यावतीने रविवार (दि ३०) रोजी बौद्धाचार्य प्रमाणपत्र परीक्षा संपन्न झाली आहे. परतुर येथील साठे नगर सभागृहामध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेसाठी मुख्य परीक्षा आद. बापू निकाळजे मुंबई. परीक्षक म्हणून युवराज मोरे नांदेड. राजेशजी सदावर्ते जालना पूर्व.उद्धाटक महेंद्रजी बनकर जालना पश्चिम. यांची मुख्य उपस्थिती होती. भारतीय बौद्ध महासभेच्या परंपरेप्रमाणे महापुरुषांचे स्मरण करून बौद्धाचार्य परीक्षेची सुरुवात करण्यात आली होती. परीक्षेच्या यशस्वीतेसाठी रामचंद्र पानवले, मधुकर खरात, भास्कर साळवे, सुदाम मस्के, सुभाष ठोके, सुरेश लहाडे, अंकुश लांडगे, हेमंत पहाडे, विमलताई शिरसाट, दामोदर मगरे, अशोक बनसोडे, सचिन हिवाळे, हिवाळे ताई, दत्ता वाघमारे इत्यादींनी प्रयत्न केले. याप्रसंगी बाबुराव हिवाळे समाज गौरव पुरस्कार. प्रा.सिद्धार्थ पानवले. समाज रत्न पुरस्कार. सुरेश गायकवाड. समाज रत्न पुरस्कार. पुरस्कार प्राप्त यांचा भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी बाबुराव हिवाळे ( समाज गौरव पुरस्कार)
प्रा. सिद्धार्थ पानवले ( समाज रत्न पुरस्कार) सुरेश गायकवाड ( समाज रत्न पुरस्कार) पुरस्कार प्राप्त यांचा भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने सत्कार करण्यात आला.




## अद्ययावत सातबारा व पीआर कार्ड मोहिम राबवावी-अभय कुलकर्णी

जालना । प्रतिनिधी - महसूल विभागामार्फत १०० दिवसांच्या विशेष कृती मोहिमेअंतर्गत जालना जिल्ह्यात जिवंत सातबारा मोहीम प्रभावीपणे राबवली जाणार असून, या माध्यमातून सातबारा उताऱ्यावर मृत खातेदारांच्या वारसांची अधिकृत नोंद केली जाणार आहे. त्याचधर्तीवर अद्ययावत सातबारा उतारा आणि पी. आर. कार्ड मोहिम राबविण्यात यावी, अशी मागणी जालना क्रेडाईचे अध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी केली आहे.



या संदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात अभय कुलकर्णी यांनी म्हटले आहे की, महसूल कायद्यानुसार सातबारा उताऱ्यावर खरेदीखताच्या आधारे नामांतर करणे आणि त्याची नोंद घेणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जिवंत सातबारा मोहिमेप्रमाणेच अद्ययावत सातबारा आणि पी. आर. कार्ड करण्याची प्रक्रिया वेगाने पार पाडण्याची आवश्यकता आहे. गहाणखताच्या आधारे बोजा नोंद करणे व खरेदीखताच्या आधारे नामांतर करणे महसूल अभिलेखासाठी आवश्यक आहे. तसेच नॉन-ग्रीकल्चरल जमिनीच्या नोंदींमध्ये सुधारणा करणे, गहाणखताच्या आधारे बोजा नोंददेखील अभिलेखावर घेण्यासाठी जालना क्रेडाई जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणार आहे. अद्ययावत सातबारा उतारा व पी. आर. कार्ड मिळाल्यास जमिनीशी संबंधित वाद-विवाद कमी होण्यास मदत होऊन नागरिकांना बँकांकडून कर्ज घेणे सुलभ बनेल. मिळकत संबंधी व्यवहार अधिक सोपे आणि पारदर्शक होतील आणि महसूल खात्याला अचूक नोंदी मिळतील. मिळकत संदर्भात व्यवहार सुरु होण्यामुळे शासनाला महसूलसुध्दा प्राप्त होणार असल्यामुळे अद्ययावत सातबारा आणि पी. आर. कार्ड मोहिम राबविणे अत्यंत अत्यंत गरजेचे असल्याचे अभय कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

## सचिन गुळवे यांची पोलिस उपनिरीक्षक पदी निवड

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** बोरखेडी चिंच ता. जाफराबाद येथील ग्राम महसूल अधिकारी सचिन गुळवे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राजपत्रित गट ब अंतर्गत यश संपादन केले असून पोलिस उपनिरीक्षक पदी त्यांची निवड झाली आहे.सदर परीक्षा नोव्हेंबर २०२३ मध्ये घेण्यात आली होती.या परीक्षेचा निकाल २५ मार्च रोजी जाहीर झाला असून यामध्ये ४४० पैकी २८० गुण मिळवून श्री गुळवे यांनी महाराष्ट्र राज्यातून ११० वी रँक मिळवली आहे. श्री गुळवे हे सध्या जाफराबाद तालुक्यातील देऊळगाव देवी या सजेवर ग्राम महसूल अधिकारी अर्थात तलाठी या पदावर कार्यरत असून त्यांनी यापूर्वी देखील एअर फोर्स,रेल्वे पोलीस, फॉरेन्सिक सायन्स, जिल्हा परिषद वरिष्ठ लेखा या पदांच्या परीक्षा सुद्धा उत्तीर्ण केलेल्या आहेत. त्यांच्या यशाबद्दल जाफराबाद तालुक्यातील सर्व स्तरातील नागरिकांनी अभिनंदन केले आहे.



युवा आदर्श

### समर्थ माझे ...

अघोर आरिष्ट येते
सहज परतून जाते
कळत नाही कधी
रे संकट आले होते
केवळ नाम स्मरणे
समर्था जुळते नाते
प्रवाह स्वता वाहतो
नौका पैलतीरी नेते
केवढे मोठे वादळ
नंतर जाणीव होते
म्हणालो होतो कधी
गणगण गणात बोते
स्वामी करती रक्षण
वलय अदृश्य असते
उणीव नाही भासली
मला जाणीव नसते
भोवती कडक उन्हे
सहज झळा सोसते
डोक्यावर स्वामीछत्र
सावली काळी दिसते
गंडांतर येवून परते
नंतर सगळे स्मरते
सद्गुरू तव महिमा
ती उरात मुरत उरते
झाडे उन्मळू पडली
हसते गवताचे पाते
अशक्त असून असा
वाचलो कसा उत्पाते
मागे वळा पहा जरा
कसले खडतर रस्ते
आलो कसा इथंवर
सोबत कोण फरिस्ते

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# संपादकीय

## ट्रॅजेडी क्वीन

हिंदी चित्रपट सृष्टीतील ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी यांचा आज स्मृतिदिन. मीना कुमारी यांचा जन्म १ ऑगस्ट १९३२ रोजी एका सुन्नी मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव मेहजबिन असे होते. कलेचा वारसा त्यांना कुटुंबातूनच मिळाला. त्यांचे वडील अली बक्ष हे चित्रपट आणि पारशी रंगभूमीवरील कलाकार होते. आई इकबाल बानू या प्रसिद्ध नृत्यांगना होत्या. कामिनी या नावाने त्या अभिनयही करत. मीना कुमारी या चार वर्षाच्या असतानाच त्यांनी अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले. लेदर फेस नावाच्या चित्रपटात त्यांनी बाल कलाकार म्हणून काम केले. त्यांनी जवळपास २० चित्रपटात बाल कलाकार म्हणून काम केले. वयाच्या १४ व्या वर्षी बच्चो का खेल या चित्रपटात त्यांनी नायिका म्हणून भूमिका केली. त्या काळात नर्गिस, नूतन, निम्मी या आघाडीच्या अभिनेत्री चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवत होत्या. मीना कुमारी यांनीही दमदार अभिनयाद्वारे त्यांच्यात स्थान मिळवले आणि लवकरच त्याही आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. कमाल अमरोही दिग्दर्शित महल हा त्यांचा चित्रपट खूप गाजला. पुढे कमाल अमारोही यांनी मीना कुमारी यांना घेऊन अनारकली नावाचा चित्रपट बनवण्याची घोषणा केली . या चित्रपटाचे शूटिंग सुरू असतानाच मीना कुमारी यांना अपघात झाला त्यात त्यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली. यावेळी कमाल अमारोही त्यांना नियमित भेटायला येत त्यातूनच त्यांचे प्रेम जमले. आर्थिक अडचणीमुळे हा चित्रपट पूर्ण होऊ शकला नाही मात्र दोघांमधील प्रेम वाढत गेले. कमाल अमारोही मीना कुमारी यांना मंजू म्हणत तर मीना कुमारी कमाल अमारोही यांना चंदन नावाने संबोधत असे. दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला तरी घरच्यांच्या संमती शिवाय लग्न करण्यास मीना कुमारी तयार नव्हत्या. मात्र कमाल अमारोही यांनी खुप आग्रह केल्याने त्यांनी लग्न केले. त्यांच्या लग्नाची बातमी त्यांच्या वडिलांना समजल्यावर ते खूप संतापले. त्यांनी दोघांच्या भेटीवर बंधने आणली. कमाल अमारोही यांनी मीना कुमारी यांना घेऊन डेरा नावाचा चित्रपट काढण्याची घोषणा केल्यावर वडील अली बक्ष यांनी मेहबूब यांच्या अमर नावाच्या चित्रपटात काम करण्यासाठी मीना कुमारी यांच्यावर दबाव आणला. चार पाच दिवसांचे शूटिंग झाल्यावर त्यांनी तो चित्रपट सोडला व थेट आपल्या नवऱ्याकडे म्हणजे कमाल अमारोही यांच्याकडे गेल्या. कमाल अमारोही यांचे पहिले लग्न झाले होते व त्यांना पहिल्या पत्नीपासून तीन अपत्येही होते. त्यामुळे मीना कुमारी यांची तीव्र इच्छा असतानाही मीना कुमारी यांना मूल होऊ न देण्याचा निर्णय त्यांच्याकडून तिच्यावर लादला गेला. मीना कुमारी यांच्या कौटुंबिक जीवनात इतकी उलथापालथ होत असताना त्यांचे चित्रपट मात्र यशस्वी होत होते. एक ही रास्ता, दिल अपना प्रीत पराई, दायरा, परिणिता, दिल एक मंदिर, शारदा, साहब बीबी और गुलाम, फुल और पथर हे त्यांनी अभिनय केलेले उल्लेखनीय चित्रपट. मीना कुमारी या फिल्म फेअर पुरस्कार मिळवलेल्या पहिल्या अभिनेत्री आहेत . १९५३ साली त्यांना बैजू बावरा साठी तर पुढील वर्षी म्हणजे १९५४ साली परिणितासाठी देखील फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. साहब बीबी और गुलाम तसेच काजल या चित्रपटातील भूमिकांसाठीही त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला आहे. मीना कुमारी या जितक्या चांगल्या अभिनेत्री होत्या तितक्याच चांगल्या कवियत्री देखील होत्या. नाझ या नावाने त्यांच्या काही उर्दू रचना प्रकाशित झाल्या आहेत. त्यांचा आवाजही गोड होत्या. मधुबाला यांना त्यांचा आवाज खुप आवडायचा. त्यांच्या यशाचा आलेख जसा उंचावत गेला तसा कमाल अमरोही यांचा हेवा वाढत गेला. मीना कुमारी यांनी अभिनय सोडून द्यावा यासाठी ते दबाव आणू लागले. मीना कुमारी यांनी अभिनय सोडण्यास नकार दिल्याने दोघांतील तणाव वाढत गेला. पुढे दोघे विभक्त झाले. त्यानंतर धर्मेंद्र यांच्याशी त्यांचे संबंध असल्याचीही चर्चा होती. ते दोघेही एकमेकांच्या प्रेमात बुडाल्याचे अनेक दाखले जुन्या चित्रपट मॅगझीन मधून मिळतात. फुल और पत्थर या चित्रपटानंतर धर्मेंद्र यांनीही त्यांच्यापासून अंतर ठेवण्यास सुरवात केल्यावर त्या व्यथित झाल्या. त्यांची प्रकृती खालावली. डॉक्टरांनी त्यांना रोज एक पेग ब्रँडी घेण्याची सूचना केली. पण एक पेगचे दोन पेग, दोनचे चार पेग असे पेग वाढत गेले. औषध म्हणून सुरू केलेली ब्रँडी लवकरच व्यसनात रूपांतरित झाली. त्या नशेच्या आहारी गेल्या. शूटिंगच्यावेळी, प्रवासात त्यांच्या पर्स मध्ये ब्रँडीची बाटली असायची. साहब बीबी और गुलाम तसेच छोटी बहू या चित्रपटातील भुमीका आपल्या वास्तव जीवनाशी साधर्म्य दाखवणाऱ्या आहेत असे त्या म्हणत. नशेच्या आहारी गेल्याने त्यांची प्रकृती खालावत गेली त्यातच त्यांचे निधन झाले. पडद्यावरील आणि वास्तव जीवनातील साधर्म्य असणाऱ्या ट्रॅजेडी क्वीन ३१ मार्च १९७२ रोजी काळाच्या पडद्याआड गेल्या. ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी यांना भावपूर्ण आदरांजली.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# शक्तीशाली भूकंपाने म्यानमार-थायलंड हादरवले; सावधान!

म्यानमार-थायलंडचा ७.७ तीव्रतेचा भयावह भूकंप तेथील जनतेसाठी अंधक्कारात नेणारा ठरला व यामध्ये शेकडोच्या संख्येने जिवितहानी झाली असून लाखोंच्या संख्येने गंभीर जखमी झालेत व अनेकजन अजुनही ढीगाऱ्यामध्ये दबलेले आहेत.हे दृश्य पाहून अंगावर शहारे येतात.म्यांमार-थायलंड किंवा अन्य ठिकाणी भयावह भूकंप किंवा महाप्रलय का येतात!याचे जिवंत उदाहरण म्हणजे मानवाने निसर्गावर केलेला अन्याय व अत्याचार होय. आज मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी आकाश-पाताळ -पृथ्वी, चंद्र-सुर्य, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण,ग्रह-तारे या सर्वांवर अतीक्रमन करून स्वतःसाठी सुखसुविधा निर्माण केल्या.परंतु या सुखसुविधा विनाशाकडे नेणाऱ्या आहेत आणि त्याचेच प्रायश्चित्त आज म्यानमार-थायलंड सारख्या जगातील अनेक देशांना भोगावे लागत आहेत व पुढेही मोठ्या प्रमाणात भोगावे लागण्याचे चिन्ह दिसत आहे. आज मानवाने केलेल्या प्रगतीचा दुरूपयोग होत असल्याने भूकंप, सुनामी, महाप्रलय,वनवे लागने,अती उष्णता,अती पाऊस,अती थंडी, ग्लेशियर वितळणे,ज्वालामुखीचा उद्रेक, समुद्राची पातळी वाढने, भुजलसाठा दिवसेंदिवस कमी होणे या संपूर्ण विनाशकारी उद्भवणाऱ्या घटना मानवाने स्वतःहून ओढवल्या आहे.कारण वाढते शहरीकरण,औद्योगिकीकरण व सुखसुविधा याकरीता मोठ्या प्रमाणात जगात जंगलतोड सुरूच आहे. यामुळे पृथ्वीच्या पोटात ज्या प्रमाणात पाणी साठा किंवा भुजलसाठा पाहिजे होता तो साठा अजीबात नसुन; जो आहे तोही दिवसेंदिवस कमी-कमी होत आहे.यामुळे जगात मोठ्या प्रमाणात वनव्याच्या घटना, भूकंप,ज्वालामुखीचा उद्रेक वाढतांना दिसतात.त्याचप्रमाणे ज्वालामुखीचा उद्रेक यांचेही मुख्य कारण जंगलतोड व बदलत्या हवामानामुळे होत आहे हे भयावह दृश्य आज आहे आणि पुढे चालून उग्र रूप धारण करून महाभयानक होण्याचे संकेत दिसत आहे. जग निर्मात्या संपूर्ण धर्मांच्या देवी-देवतांनी मानवाला जन्माला यासाठी घातले की या पृथ्वीतलावर एकतरी बुध्दीजीवी प्राणी असावा जेणेकरून तो संपूर्ण मानवजातीसह, मुक्या प्राण्यांची, संपूर्ण जीवजंतू, पशुपक्षी, निसर्ग व पृथ्वी यांचे रक्षण करू शकला पाहिजे.परंतु आज मानवाने स्वतःच्या फायद्यासाठी व स्वार्थासाठी संपूर्ण सीमारेषा ओलांडून आज पृथ्वीवरील संपूर्ण प्राणीमात्रांचा जीव धोक्यात टाकला आहे व याचे जिवंत उदाहरण म्हणजे म्यानमार-थायलंडमध्ये ७.७ तीव्रतेचा आलेल्या भूकंपाने संपूर्ण अस्तव्यस्त करून हाहाकार निर्माण केला.आज जगातील अनेक देश आगीशी खेळतांना दिसतात यात अमेरिका, रशिया, युक्रेन, इजरायल, इराण, पोलंड,चीन, उत्तर कोरिया इत्यादीसह अनेक देश एकमेकांवर बंदुका तानुन बसले आहेत व मोठ्या प्रमाणात बॉम्ब वर्षाव करीत आहे यामुळे सर्वत्र आगडोंब उसळल्याचे दिसून येते आणि हे सर्व वर्चस्वाच्या लढाईसाठी आहे.याकरीता एकमेकांना मोठ्या प्रमाणात विनाशकारी युद्ध सामुग्रीची देवाणघेवाण सुध्दा करीत आहेत.यामुळे अनेक देश युध्दाच्या खाईत लोटल्याने तीथे फक्त आगीचे गोळे बरसतांना दिसतात. आज जगातील करोडो एकर भुभागांची राखरांगोळी झालेली आहे व अनेक मोठमोठी जंगले आताही जळत आहे.जगातील संपूर्ण देश आज बारूतच्या ढीगाऱ्यावर बसले आहे. एवढे नुकसान डोळ्यासमोर असुनही रशिया -युक्रेन, इजरायल-इरान,हमास सह अनेक देश एकमेकांना संपविण्याची भाषा करीत आहे व युद्ध सामुग्रीच्या शर्यतीत चढा-ओढ सुरू आहे.म्हणजेच आज जग किती विनाशाकडे जात आहे हे चित्र स्पष्ट दिसून येते. जगातील काही देश गृहयुद्धाने भरडलेले आहेत त्यामुळे तीथेही रक्ताच्या नद्या वाहतांना दिसतात.पृथ्वीचा व निसर्गाचा विनाश वेळीच रोखला गेला नाही तर धरणीमाता पृथ्वीतलावर असणाऱ्या संपूर्ण जीवसृष्टीला गीळंकृत केल्याशिवाय राहणार नाही हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे जगातील नेत्यांनो आतातरी सावधान व्हा व पृथ्वीला वाचवण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करा अजुनही वेळ गेलेली नाही.कारण मानवाने आपल्या सुखसुविधांसाठी संपूर्ण हद्दी पार केल्याचे दिसून येते.या पृथ्वीतलावर लाखो प्रजातीचे प्राणी, पशुपक्षी, जीवजंतू वास्तव करतात. परंतु यात बुध्दीजीवी जात एकच आहे ती म्हणजे मानव आणि एकट्या मानवाने ही विनाशलिला उभी केली आहेत.त्यामुळे जगात दिवसेंदिवस भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे आणि याला मुख्य कारणीभूत फक्त बुध्दीजीव प्राणी म्हणजे मानवच आहे.जगात दिवसेंदिवस विनशलिला वाढतच आहे तरीही मानलाचा निसर्गावर व पृथ्वीवर होणारा अत्याचार अजुनपर्यंत थांबलेला नाही हे मानवजातीचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.मानवाने आपला अतिरेक वेळीच थांबविला नाही तर म्यांमार-थायलंड पेक्षाही भयावह भुकंप किंवा महाप्रलय जगाच्या कानाकोपऱ्यात केव्हाही कधीही उद्भवू शकतात यालाही नाकारता येत नाही. असे सांगितले जाते की म्यांमार -थायलंडमध्ये आलेला भूकंप हा २०० वर्षांपूर्वी आलेल्या भूकंपापेक्षाही घातक असल्याचे सांगितले जाते.भारतात गुजरात मधील भुजमध्ये २६ जानेवारी २००१ ला ७.७ तीव्रतेचा भूकंप आलेला होता.तेव्हा या भूकंपात २० हजार लोकांचा मृत्यू झाला होता व दिड लाखांपेक्षा जास्त लोक गंभीररीत्या जखमी झाले होते आणि मोठ्या प्रमाणात वित्तीय हानी सुध्दा झाली होती. वैज्ञानिकांकडुन सांगितले जाते की भूकंपचा केंद्र असलेला म्यानमार मधील मांडाले क्षेत्र संवेदनशीलमध्ये गणल्या जाते. भारतीय आणि यूरेशियन प्लेट यांच्यात टकराव झाल्याने २८ मार्चला भिषण भूकंप आला.या सर्वच घटनांना कारणीभूत आपणच आहोत. आज युद्धजन्य परिस्थिती व बदलते हवामान यामुळे अनेक पशुपक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे संपूर्ण परिस्थिती पाहता जगातील संपूर्ण देशांनी येणाऱ्या नैसर्गिक आपदांपासुन सावध रहाण्यासाठी निसर्गाची जोपासना केली आहे. कारण म्यानमार -थायलंड आलेल्या अती तीव्रतावाल्या भुकंपाने भारतातील अरूणाचल प्रदेश,पश्चिम बंगाल येथे झटके जानवले सोबतच चीन, व्हियेतनाम,तायवान, आणि लाओस याठिकाणी सुध्दा भूकंपाचे झटके जानवले.म्हणजे नैसर्गिक आपदा केव्हा व कुठे येईल हे सांगता येत नाही.आग व पाणी यांच्याशी खेळू नका कारण आग केव्हा भस्मसात करेल ते सांगता येत नाही व पाणी केव्हा कुठे वाहुन नेईल व डुबवेल हेही सांगता येत नाही त्यामुळे सावधान!कारण या जखमा कधीच भरून निघु शकत नाही.त्यामुळे जगातील देशांनो पृथ्वीच्या रक्षणासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करा तेव्हाच आपण येणाऱ्या नैसर्गिक महाप्रलयाला थोडा का होईना अंकुश लावु शकु.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# एसएन ग्रुपतर्फे देऊळगाव राजा पोलीस स्टेशन आवारात पक्ष्यांना पिण्यासाठी पाण्याची सोय

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या एस एम ग्रुप ऑफ फाउंडेशन हे विविध उपक्रमाने आपल्या कार्यक्रम साजरी करत असतात सध्या उन्हाळ्याचे दिवस असून विविध पक्षी पाण्यासाठी भटकंती करीत असतात त्यांच्या पाण्याची सोय म्हणून देऊळगाव राजा पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्यासाठी पाण्याची सोय करून देण्यासाठी प्लॉट देण्यात आले आहे. त्या प्लॉटमध्ये पाणी भरून पशुपक्ष्यांसाठी ही सोय करून देण्यात आलेली आहे. तेथील पोलीस स्टेशनच्या स्थापने ग्रुप ऑफ फाउंडेशनच्या कार्याची कौतुक केली असून असे सामाजिक उपक्रम आपल्याकडून घडावेत अशी आशा अपेक्षा सुद्धा त्यांनी व्यक्त केली आहे.आज एस.एन.ग्रुप फाउंडेशन मार्फत देऊळगाव राजा पोलीस स्टेशन इथे पक्षानं साठी पाणी पिण्या साठी माती चे पॉट लावण्यात आले उपस्थित सर्व पोलिस अधिकारी तसेच एस.एन.ग्रुप फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष दुर्गेश बनकर पाटील. संदेश चव्हाण,आदित्य सरदार, विशाल नवले ,पवन खरे,विलास गायके , विशाल चेके, योगेश अंभोरे, कार्तिक शेळके, अनुराग जाधव आदींची उपस्थिती होती.



## युपीआय, टॅक्स, जीएसटी नियम बदलणार

**मुंबई -** १ एप्रिलपासून नवं आर्थिक वर्ष सुरु होणार आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात अनेक नियम बदलणार आहेत. क्रेडिट कार्ड, म्युच्युअल फंड, यूपीआय, टॅक्स, आणि जीएसटी संदर्भातील नियम बदलणार आहेत. पारदर्शकता वाढवणे, गुंतवणुकूदारांची सुरक्षा निश्चित करणे यासंदर्भातील बदल होणार आहेत. गुंतवणूकदारांना आता त्यांच्या डीमॅट आणि म्युच्यअल फंड होल्डिंग स्टेटमेंटस डिजिटली जतन करण्याची सुविधा मिलेल. यामुळं अनक्लेम्ड असेटची संख्या कमी होईल. सेबीच्या नव्या नियमानुसार न्यू फंड ऑफरिंगद्वारे जमवण्यात आलेल्या फंडाची रक्कम बाजार सुरु असणाऱ्या ३० दिवसांमध्ये गुंतवणूक करावी लागेल. जर, एखादी असेट मॅनेजमेंट कंपनी या कालावधीत रकमेची गुंतवणूक करु शकली नाही तर गुंतवणूक समितीकडून एकदा ३० दिवसांसाठीची मुदतवाढ घेता येईल. ६० दिवसांमध्ये रक्कम गुंतवली नाही तर अशा स्थितीत एएमसीला गुंतवणूक स्वीकारण्यास मनाई केली जाईल. तर, गुंतवणूकदारांना कोणत्याही दंडाशिवाय बाहेर पडण्याची परवानगी मिळेल. सेबीनं स्पेशलाइज् इन्वेस्टमेंट फंडस् म्हणून नवी कॅटेगरी सुरु केली आहे. म्युच्युअल फंड आणि पोर्टफोलिओ मॅनेजमेंट सर्व्हिसेसमध्ये एक कॅटेगरी असेल.

# कायद्याच्या रक्षणासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी कठोर व्हावे - रवींद्र मालुसरे

**मुंबई । प्रतिनिधी -** पोलिस वा 'खाकी वर्दी' म्हंटल की धाक, रुबाब, अशी एक संकल्पना सामान्य नागरिकांच्या डोळ्यासमोर उभी राहते. खाकी वर्दीतील तापट स्वभावाचा, कडक शब्दांत बोलणारा, हेकेखोर, असंवेदनशील व्यक्ती अशीच प्रतिमा सर्वसामान्यांच्या मनात असल्यामुळे अनेकजण पोलिसांपुढे जाण्यास घाबरतात. पोलिस अधिकाऱ्याला कर्त्यव्यासाठी वेळप्रसंगी थोडे कठोर व्हावे लागत असले, तरी वर्दीतही अगोदर तो मनुष्य असतो. त्यालाही मन, भावना असतात. माणुसकीच्या नात्याने प्रसंगी मदत करतात, सल्ला देतात, पण कायद्याचे रक्षण करण्यासाठी आणि वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी त्यांना कठोर राहावं लागतं असे उदगार मराठी वृत्तपत्र लेखक संघांचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी काढले. गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला भारतीय दलित साहित्य अकादमीच्या वतीने दादर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस प्रमुख राजेंद्र आव्हाड साहेब यांचा मालुसरे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार दत्ताराम घुगे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर वैशाली रोडवेजचे मालक शिवाजीशेठ उगले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद काकड साहेब, ताडदेव व्यायामशाळेचे सेक्रेटरी सुरेश सांगळे, योगेश कराड, हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

खाकी वर्दीतील देव माणूस हे वाक्य साजेल व पोलीस दलाची मान उंचावेल असे काम राजेंद्र आव्हाड यांच्या हातून होत असते, भविष्यात अशा धडाडीच्या कामगिरीमुळे व उत्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपतींचे पोलीस पदक जाहीर होऊन त्यांना गौरविण्यात यावे अशी अपेक्षा मालुसरे यांनी व्यक्त केली. तर दत्ताराम घुगे म्हणाले की, महाराष्ट्र नशीबवान आहे. प्रशासनात आजही त्यांच्यासारखे असे अनेक अधिकारी आहेत ज्यांचं माणूसपण सुटलेलं नाही. त्यांनी केलेल्या या कामाबद्दल जेव्हा विचारले जाते तेव्हा ते विनम्रपणे सांगतात की, मी फक्त माझं कर्तव्य करतो... वेगळं काहीच नाही. पोलिसांना जात नसते ना धर्म असतो. लोकांचं रक्षण, त्यांच्या मदतीला धावणे हाच त्यांचा खरा धर्म असतो. त्यामुळे मानवता हा एकच धर्म मी मानतो. समाजात आपल्या हातून चांगले कार्य घडावे हीच अपेक्षा व जाणीव ठेवून आम्ही काम करीत असतो.

मुंबई सायबर सेलच्या अनिता नामदेव आव्हाड यांचा अकादमीच्यावतीने तर जागतिक महिला दिनानिमित्त नंदिनी नंदकुमार पाटील यांच्या कलाश्रम संस्थेच्या वतीने सौ. मंदाकिनी शि. उगले यांना मधुरा वेलणकर- साटम यांच्या माधुरी घुगे स्मृती पुरस्काराने गौरविल्याबद्दल त्यांचाही यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



# ग्रंथोत्सवाचा उत्साहात समारोप

**जालना । प्रतिनिधी -** उच्च व तंत्र शिक्षण विभाग,ग्रंथालय संचालनालय आणि जालना जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात येथे आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचा समारोप प्राचार्या डॉ. सुनंदाताई तिडके यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला.

यावेळी कवयित्री डॉ.संजीवनी तडेगावकर, डॉ.रावसाहेब ढवळे, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राजेश राऊत, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे, सतीश जाधव, शंकर पवार यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

या दोन दिवसीय ग्रंथोत्सवामध्ये रसिकांना परिसंवाद, कवी संमेलन, कथाकथन अशा विविध सत्राचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथोत्सवातील विविध कार्यक्रमांना साहित्यिक, कवी, विद्यार्थी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## तर फडणवीसांना पाठींबा - राज ठाकरे

**मुंबई** - लोकसभेत मोदींना बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या राज ठाकरेंनी आता देवेंद्र फडणवीसांना पाठिंबा देण्याची भाषा केली आहे. महाराष्ट्राचे प्रश्न सोडवणार असतील, मराठी माणसाच्या चांगल्यासाठी काम करणार असतील तर फडणवीसांना पाठिंबा असेल असं राज ठाकरेंनी गुढीपाडवा मेळाव्यातून जाहीर केलं. सगळे पक्ष महापालिका निवडणुकांची तयारी करत असताना राज ठाकरेंनी हे मोठं वक्तव्य केलं आहे. तसेच भाजपच्या इतर सर्व मुद्द्यांना विरोध करत राज ठाकरेंनी देवेंद्र फडणवीसांना मात्र पाठिंबा जाहीर केल्यानं अनेकांच्या भुवयाही उंचावल्या आहेत.

राज ठाकरे म्हणाले की, निवडणुका संपल्या, शिमगा संपला. देवेंद्र फडणवीसांच्या हाती एक सुसंस्कृत राज्य आलेलं आहे. मराठी माणसासाठी जर चांगल्या गोष्टी करणार असाल तर आमचा तुम्हाला निश्चितपणे पाठिंबा आहे. पण प्रत्येक गोष्ट आमचं ऐकून करा.

ज्या फडणवीसांना राज ठाकरेंनी पाठिंबा जाहीर केला आहे त्या फडणवीसांच्या भाजपनं औरंगजेबाची कबर हटवण्याची भूमिका घेतली आहे. मात्र शिवरायांच्या पराक्रमाची साक्षीदार म्हणून औरंगजेबची कबर असली पाहिजे अशी भूमिका राज ठाकरेंनी जाहीर केली. जो औरंगजेब महाराष्ट्रावर चाल करून आला होता त्याला मराठ्यांनी याच मातीत गाढलं. औरंगजेबाची कबर पाहून हा इतिहास प्रत्येकाला समजेल. शिवरायांचा पराक्रम शिकवण्यासाठी शाळेच्या सहली औरंगजेबच्या कबरीजवळ नेल्या पाहिजेत असा सल्लाही त्यांनी दिला. चित्रपट पाहून जागे होणारे हिंदू काही कामाचे नाहीत असा टोला देखील राज ठाकरेंनी लगावला.

दरम्यान राज ठाकरेंनी विविध विषयांवरून विरोधकांना धारेवर धरलं. मनसे हा हरलेला पक्ष नाही असं बोलून कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. प्रयागराजमध्ये झालेल्या गंगास्नानावरून देखील त्यांनी नदी सफाईचा मुद्द्याला पुन्हा हात घातला. गंगा सफाईवरून राज ठाकरेंनी घेतलेल्या भूमिकेवर टीका करणाऱ्यांना देखील धू-धू धुतल्याचं दिसून आले.






महात्मा ज्योतीबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती

# महाप्रसाद वाटप समितीची निवड

**जालना । प्रतिनिधी -** क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले जयंतीनिमित्त व भारतरत्न डॉ. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त यावर्षी १४ एप्रिल २०२५ रोजी ११ हजार १३४ लाडुचे वाटप करण्यात येणार आहे. यावर्षी लाडु वाटप समितीच्या अध्यक्षपदी सुनिल रत्नपारखे यांची निवड करण्यात आली आहे. तर कार्याध्यक्ष सुधाकर निकाळजे, सचिव संदीप हिवराळे, उपाध्यक्ष स्वप्नील गायकवाड, मुन्ना भोसले, विष्णु पाचफुले,सुरेश खरात, व्यवस्थापक कार्याध्यक्ष -इब्राहिम शेख, ड.हर्षद बागवान, भाऊसाहेब घुगे,व्यवस्थापक बाबासाहेब वानखेडे, व्यवस्थापक अध्यक्ष सुरेश रत्नपारखे, विनोद उर्फ पिंटु रत्नपारखे, डॉ. श्रावण शेवाळे, अ.भा. महात्मा फुले समता परिषद जिल्हाध्यक्ष मधुकर झरेकर, समिती उपाध्यक्ष दीपक वैद्य, सचिव- कडुबा वाकीकर, ॲड. रामेश्वर खांडेभराड, सहसचिव- कडुबा वाकीकर, सदस्य महेंद्र शिंदे,सय्यद सलमान,ड.उमाकांत पैठणे, ए.जे. बोराडे, ॲड. ब्रह्मानंद चव्हाण, रवी रत्नपारखे, बाबुराव मामा सतकर, नंदकिशोर जांगडे, रामचंद्र फुलझाडे,शिवकुमार राऊत,शंकर घोडके, सुनिल साळवे, सुधाकर रत्नपारखे, रंधीर रत्नपारखे,



हरेष रत्नपारखे, विलास रत्नपारखे, प्रतिक लांडगे, संतोष जमधडे,गवई, ड. संजय काळबांडे, फिलीप्स उगले, वंदना खांडेभराड, मंगला खांडेभराड, योगेश रत्नपारखे, सुनिल साळवे, अमोल धानुरे, शिवकुमार राऊत, शंकर घोडके, रामचंद्र घोडके, बाबा पठाण, मोहन जायभाये, अमरदिप शिंदे, वैजीनाथ नागरे, अशोक खांडेभराड, दत्ता खांडेभराड, सुयोग खर्डेकर, धनंजय देशमुख, ॲड. संदीप पडुळ, संजीव देशमुख, कल्याण दळे, राजेंद्र राख, राजेंद्र शिंदे, संभाजी मगरे, देवानंद डोईफोडे, श्री. डोंगरे, हेलगट, प्रदिप मघाडे, प्रेम जाधव, सतीश खांडेभराड, गोकुळ स्वामी, विजय पवार, सुरेश दांडगे, सुभाष सातपुते, राजेश राऊत, शंकर घोडके, रवि राऊत, नंदकुमार जांगडे, राजेंद्र जाधव, तनपुरे, दिनकर घेवंदे, अरविंद देशमुख, धनसिंग सुर्यवंशी, सुधाकर रत्नपारखे, महेंद्र रत्नपारखे, अशोक मकोडे, नितीन तायडे, मदन खरात, सय्यद अखिल, गणेश तरासे, लखन जांगडे, संतोष गायकवाड, रमेश भगत, अशोक पांगारकर, बाळु म्हस्के, समाधान म्हस्के, रमेश मुळे, सतीश खांडभराड, मगरे टेलर, शिवलाल अक्षय, शिवलाल घाडगे, खरात जारवाले यांची निवड करण्यात आली.

# मंठ्यात संभाजी महाराजांच्या बलिदान मास समाप्ती निमित्त स्मरण मुक पद यात्रा

**मंठा । प्रतिनिधी -** छत्रपती संभाजी महाराज यांना झालेल्या यातनांचे स्मरण करत सशक्त हिंदू राष्ट्र निर्माण करण्यासाठी महाराजांचे विचार हे प्रत्येकाच्या घराघरात पोहोचले पाहिजेत. महाराज हे खऱ्या अर्थाने धर्मरक्षक व स्वराज्यरक्षक होते.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान मास समाप्ती निमित्त त्यांच्यावर झालेल्या यातनांचे स्मरण करण्यासाठी मंठा शहरात स्मरण मुकपद यात्रा काढण्यात आली. या यात्रेत ५०० हुन अधिक नागरिक उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती महाराज महाराज चौक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, लहुजी चौक, सुगंधा नगर, संभाजी नगर, बोराडे गल्ली येथून छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, मंठा येथे स्मरण यात्रेची सांगता करण्यात आली. छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त २८ फेब्रुवारी ते २९ मार्च दरम्यान शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानतर्फे बलिदान मास आयोजित केला होता. या दरम्यान दररोज सायंकाळी संभाजी महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून शिववंदना करण्यात आली. युवा कार्यकर्त्यांनी या बलिदान मास दरम्यान आपल्या आवडत्या व्यंजनांचा त्याग केला होता. छत्रपती संभाजी महाराजांना फाल्गुन शुद्ध प्रतिपदा दिवशी फितूरीने पकडले होते आणि पकडल्या क्षणापासून ते फाल्गुनी अमावस्या पर्यंतच्या या महिन्याभरात त्यांचा अतोनात छळ करण्यात आला होता. या काळात छत्रपती संभाजी महाराजांनी यातना सहन करत आपला स्वराज्यधर्म सोडला नव्हता. त्यांनी भारतमातेसाठी, देव, देश, धर्मासाठी बलिदान दिले.त्यांच्यावर झालेल्या यातनांचे स्मरण करण्यासाठी शहरात मूकपदयात्रा काढण्यात आली.

या यात्रेत कोणत्याही प्रकारच्या घोषणा न देता, आवाज न करता, पायात चप्पल न घालता व शांततेत स्मरण यात्रा काढण्यात आली. या यात्रेत मंठावासिय तसेच परिसरातील विद्यार्थी व नागरिक शेकडोंच्या संख्येने सहभागी झाले होते.




# जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर उभारली शेतमालाची गुढी

## शेतकरी कर्जमाफीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचं अनोखे आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात शेतकरी कर्जमाफीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं रविवार (दि ३०) रोजी अनोखे आंदोलन केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतमालाची गुढी उभारून स्वाभिमानीने राज्य सरकारचा निषेध नोंदविला. विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र, महायुती सरकारने अद्याप पर्यंत शेतकऱ्यांची कर्जमाफी केली नाही. शिवाय राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या आशेवर बसू नका असे सांगत परिस्थिती बघून निर्णय घेऊ असे म्हटले आहे.

जालन्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं आज मोसंबी,संत्रा, गव्हाची वंबी, द्राक्ष,कापूस, मकयाचं कणीस असा शेतमाल गुढीला बांधून



शेतमालाची गुढी उभारलीय. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेश द्वारावर ही गुढी उभारण्यात आली.म ही गुढी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गेटवर उभारुन राज्य सरकारचा निषेध नोंदवण्यात आला.या वेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी राज्य सरकार,मुख्यमंत्री तसेच दोन्हीही उपमुख्यमंत्री यांच्या विरोधात घोषणाबाजी करून शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याची मागणी केली. दरम्यान अजित पवार यांनी कर्जमाफी बद्दल घुमजाव केलंय,त्यामुळे यापुढे सरकार विरोधात रस्त्यावरची लढाई लढण्याचा ईशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला.

यावेळी शेतकरी संघटनेच्या वतीने विविध निवेदन देण्यात आले प्रशासनाच्या वतीने नायब तहसीलदार राजेंद्र निहाळ यांनी मागण्यांचे निवेदन स्वीकारले.

यावेळी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश काळे, बदनापूर तालुकाध्यक्ष नरेश फटाले, बाबासाहेब दखणे, अंकुश तारख, मुकेश डूचे, अभिजित काळे, उमेश पाष्टे, राजेंद्र शिनगारे, सतीश मोरे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# जैन धर्मीय माताजी यांचे देऊळगाव राजाहून इंदौरकडे मंगल विहार



**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** श्री १०८ गणाचार्य विरागसागरजी गुरुदेवांच्या परम प्रभावक शिष्या श्री १०५ श्रमणि आर्यिका विबोधश्री माताजी व ससंघाचा आज दुपारी ४.०० वाजता देऊळगावराजा हून निघाले असून टेंभुर्णी कडे जाताना त्यांचा मुक्काम अकोला देव येथे झाला. आज सकाळी ते अकोला देव हून निघून पुढे निघणार आहे. देऊळगावराजा हून अकोला देव टेंभुर्णी जाफ्राबाद चिखली बुलढाणा मलकापूर अदलाबाद ब्रहानपूर खंडवा इंदोर असा सगळा प्रवास पायी असून हा सगळा प्रवास ते येणाऱ्या २०ते २५ दिवसात पूर्ण करणार आहे. त्यांचे रोड ने जाता जाता सर्व भक्ती मंडळी दर्शन चास लाभ घेत आहे.तरी सर्वांनी जास्तीत जास्त संख्येने विहार मध्ये सामील व्हावे असे आव्हानं करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय किशोरवयीन स्वास्थ कार्यक्रमा अंतर्गत डोनगांव येथे मुलांना बॅग वाटप



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र डोनगांव येथे राष्ट्रीय किशोरवयीन स्वाथ्य कार्यक्रमा अंतर्गत पिअर एज्युकेटर यांना बॅग वाटप करण्यात आल्या.हा कार्यक्रम जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.भुसारे मॅडम व जिल्हा सामान्य रुग्णालय जालनाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.राजेंद्र पाटिल सर ,जिल्हा किशोरी समन्वयक अवचार, ग्रामीण रुग्णालय टेम्भुर्नीचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.शिंगने, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रतिभा मुळीक, श्री. कऊटकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. किशोरवयीन मुलांना व मुलींना किशोरवयीन वयात होणारे बदल, पोषक आहार,वाढ व विकास,स्किनला होणारे आजार, ताण तणाव,मानसिक आरोग्य,व्यसनाधीनता,लैंगिक शिक्षण, असंसर्गजण्य आजार, लोहयुक्त गोळ्या , कुपोषण, ॲनिमिया,वैयक्तिक स्वच्छता,लैंगिक शिक्षण, किशोरवयीन वयात होणारे शारीरिक मानसिक बदल, मासिक पाळी स्वछता व , सॅनिटरी पॅड, गरोदरपणात घ्यावयाची काळजी, कौटुंबिक हिंसाचार, लग्नपूर्व समुपदेशन इत्यादी बद्दल समुपदेशक मल्हारी भगवान उमाप व सागर दांडगे यांनी मार्गदर्शन केले.तसेच राट्रिय असंसर्गजन्य आजाराबद्दल श्री.शरद सुर्वे यांनी माहिती दिली. यावेळी डॉ. मुळीक यांनी नियमित हात स्वच्छ धुणे, नियमित पोषक आहार घेणे, असंसर्गजन्य आजार ,लैंगिक शिक्षण,मुलींना मासिक पाळीत घ्यावयाची काळजी,मासिक पाळीचे चक्र व मैत्री क्लीनिक चा लाभ घेण्याचे आव्हान केले. यावेळी डॉ. अर्चना अघाव, गणेश डोईफोडे, श्री.घायाळ, गाडेकर मॅडम, गायकवाड मॅडम, आरोग्य सहाय्यिका, आरोग्य सेवक, आशा उपस्थित होते. डोईफोडे यांनी आभार मानले.

# हैद्राबादला नमवत दिल्ली गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी

दिल्ली कॅपिटल्सने रोमहर्षक सामन्यात वादळी फलंदाजी करणाऱ्या सनरायझर्स हैदराबादवर ७ विकेट्सने मोठा शानदार विजय मिळवला आहे. सनरायझर्स हैदराबाद संघाला सर्वबाद करत दिल्लीने २५ चेंडू बाकी ठेवत विजय मिळवला. दिल्लीने सुरूवातीपासूनच सामन्यात आपला दबदबा कायम ठेवला आणि अखेरीस विजय मिळवून गतवर्षीच्या सामन्यातील पराभवाचा व्याजासकट बदला घेतला. मिचेल स्टार्कचे पाच विकेट्स आणि नंतर प्रत्येक फलंदाजाने फलंदाजीत दिलेले योगदान यामुळे दिल्लीचा संघ हा सलग दुसरा विजय मिळवण्यात यशस्वी ठरली. अभिषेक पोरेलने १६व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजयी षटकार लगावत दिल्लीचा विजय निश्चित केला. सलग दुसरा विजय नोंदवला आणि गुणतालिकेत आरसीबीनंतर दुसरे स्थान गाठले आहे.



# ईद-उल-फित्र ची नमाज ईदगामध्येच पठण करावी

## रहेमानिया इदगाह कमिटीचे अमजद खान यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** शहरामध्ये मोठी तीन ईदगाह आहेत. नवीन जालन्यांमध्ये सदर बजार ईदगाह, जुन्या जालन्यामध्ये कदीम जालना ईदगाह तर गांधीनगर भागामध्ये रहेमानिया ईदगाह तसेच चंदनझीरा येथे फैज ऊलऊलूम मदरसा येथे अशा महत्वाच्या ईदगाह शहरात असून मुस्लिम बांधवांनी ईदची नमाज ईदगामध्ये पठण करावी असे आवाहन रहमानिया इदगाचे पदाधिकारी अमजद खान अकबर खान यांनी आज दि.३० रविवार रोजी दुपारी तीन वा. च्या सुमारास केले आहे.

गांधीनगर येथील ईदगाह मैदानाची स्वच्छता करून मैदानावर मंडप बांधण्याचे काम पूर्ण झालंय. उद्या रमजान ईद सण सर्वत्र साजरा होणार आहे. त्यानिमित्त सामूहिक नमाज पठणसाठी जालन्यातील विविध ईदगाह मैदानांची साफसफाई करून त्यावर सध्या पाणी मारण्याचे करण्यात येत आहे. जालना शहरात तीन ते चार मोठे ईदगाह मैदान आहेत. या ईदगाह वर स्वच्छता करून मैदानावर लाऊड स्पीकर लावणे आणि मंडप बांधण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.